# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे

# कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील अभियानातील यशस्वी गावे आणि निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी

## (Successful Villages in Abhiyan from Kolhapur and Sangli Districts and Implementation of Abhiyan in Selected Villages)

**प्रस्तावना (Introduction)**

प्रस्तुत प्रकरण दोन भागात विभागले आहे. पहिल्या विभागात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०००-०१ ते २००५-०६ या सहा वर्षाच्या कालावधीत जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या गावांची सर्वसाधारण माहिती सादर केली आहे. सदर माहितीच्या आधारे पारितोषिक प्राप्त गावासंबंधीची काही ठळक निरीक्षण नोंदविली आहेत.

दुस-या विभागात, शेळकेवाडी आणि कोरेगाव या प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी विषयीचे विवेचन केले आहे. त्यासाठी कोरेगाव व शेळकेवाडी या गावात प्रत्यक्ष भेटी देवून त्या गावातील ग्रामपंचायतीमधील अभियानाच्या अंमलबजावणीविषयीचा अहवाल मिळविण्यात आला.

## विभाग १

### सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हास्तरीय क्रमांक मिळविलेल्या गावांची सर्वसाधारण माहिती

प्रस्तुत अभ्यासासाठी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०००-०१ ते २००५-०६ या कालावधीत जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या गावांची सर्वसाधारण माहिती सादर केली आहे. सांगली जिल्ह्यातील १६ गावांची, कोल्हापूर जिल्ह्यातील १७ गावांची अशा एकूण ३३ गावांची सर्वसाधारण माहिती मिळविलेली आहे. त्यात गावांची एकूण लोकसंख्या, पुरुषाची संख्या, स्त्रियांची संख्या, स्त्री-पुरुष प्रमाण, कुटुंबांची संख्या, भौगोलिक क्षेत्र, बागायत क्षेत्र, जिरायत क्षेत्र, प्रमुख पिके, गावचा मुख्य व्यवसाय, शैक्षणिक संस्था,

दवाखाने, बँका, पतसंस्था, महिला मंडळ, वैयक्तिक शौचालय, बायोगॅस इत्यादी महत्त्वपूर्ण अनेक घटकांचा समावेश केलेला आहे. त्यांचे थोडक्यात विश्लेषण करून पारितोषिक प्राप्त गावांची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**सारणी क्रमांक ३.१**

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०००-०१ ते २००५-०६ या कालावधीत जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविलेल्या ३३ गावांची सर्वसाधारण माहिती दर्शविणारा तक्ता**

| अ. क्र. | गावाची नावे | एकूण लोकसंख्या | पुरुषांची संख्या | स्त्रियांची संख्या | स्त्री-पुरुष गुणोत्तर | कुटुंबाची एकूण संख्या | भौगोलिक क्षेत्र हेक्टर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | ५०३४ | २६१३ | २४२१ | ९६२ | ८९९ | ७१७ |
| २ | अंकलखोप | १०६६० | ५४५० | ५२१० | ९७७ | १९१९ | ११०२ |
| ३ | कवठेपिरान | १०३२४ | ५३०६ | ५०१८ | ९७२ | १८९४ | २०९० |
| ४ | य. पा. वाडी | १३०० | ६२३ | ६७७ | **१०४२** | २४५ | ७०५ |
| ५ | माळवाडी | ११०५ | ५१४ | ५९१ | **१०७०** | २४९ | २९० |
| ६ | भिलवडी | ९६२२ | ५२०० | ४४२२ | ९१९ | २१६८ | २५७० |
| ७ | राडेवाडी | ९१७ | ४६१ | ४५६ | ९९५ | १५२ | २१० |
| ८ | आरवडे | ३७७५ | १८७५ | १९०० | **१००७** | ५७४ | १४५० |
| ९ | ऐतवडे खुर्द | ६७६० | ३४९० | ३२७० | ९६७ | ११४० | ११४२ |
| १० | गोटखिंडी | ६७९५ | ३४३९ | ३३५६ | ९८८ | ९५९ | ११९५ |
| ११ | सांगोले | ७७५ | ३३५ | ४०० | **१०८८** | १५५ | ६२७ |
| १२ | भिलवडी स्टेशन | ११५५ | ६४३ | ५१२ | ८८७ | १७७ | ६२ |
| १३ | कोरेगाव | ५०२६ | २५५६ | २४७० | ९८३ | ८४० | ६१७ |
| १४ | नागेवाडी | ७५८ | ३८९ | ३६९ | ९७४ | १४६ | ५६६ |
| १५ | सूर्यगाव | १२१० | ६४३ | ५६७ | ९३७ | १६५ | २१२ |
| १६ | कासलिंगवाडी | १३०० | ६७५ | ६२५ | ९६२ | २०० | ३३५ |
| १७ | मजरे कार्वे | ९३९ | ५०२ | ४३७ | ९३१ | २४८ | २६७ |
| १८ | दत्तवाड | ९३११ | ४७५६ | ४५५५ | ९७८ | १८६२ | १६०३ |
| १९ | सडोली खालसा | ४०९८ | २१३० | १९६८ | ९६० | ८३० | ४६४ |
| २० | बहिरेवाडी | ४११२ | २१४३ | १९६९ | ९५८ | ६४७ | ३७८ |
| २१ | आमशी | ३०७८ | १६१० | १४६८ | ९५४ | ६०५ | ६९० |
| २२ | चंद्रे | २९६५ | १५२७ | १४३८ | ९७० | ५१४ | ४२९ |
| २३ | मजरेवाडी | २१०६ | ११०९ | ९९७ | ९४७ | ३७० | ३५० |
| २४ | मडिलगे खुर्द | १७२७ | ८८९ | ८३८ | ९७० | ३४६ | २५२ |
| २५ | जैन्याळ | १५०८ | ७४५ | ७६३ | **१०१२** | २८६ | ५०१ |
| २६ | सावते | १३४५ | ६९५ | ६६० | ९७४ | २०६ | |
| २७ | जाखले | ३४८६ | १७१० | १७७६ | **१०१९** | ६१४ | १०२४ |
| २८ | निलेवाडी | १७६२ | ९६० | ८०२ | ९१० | २८५ | १२६ |
| २९ | कांबळवाडी | १००३ | ५१४ | ४८९ | ९७५ | १३७ | २३६ |
| ३० | कुंभारवाडी | ९२९ | ४६६ | ४६३ | ९९७ | १७८ | |
| ३१ | शिवणगे | ११७४ | ५७२ | ६०२ | **१०२६** | १९७ | ३४५ |
| ३२ | माजगांव | २६३७ | १३५८ | १२७९ | ९७० | ४८८ | २२८ |
| ३३ | शेळकेवाडी | ३६७ | १७४ | १९३ | **१०५२** | ६५ | ८० |
| | एकूण | १०९०६३ | ५६०७२ | ५२९६१ | ९७१ | १९७६० | २२३८३ |
| | सरासरी | **३३०४.९** | **१६९९.२** | **१६०४.९** | **९७१** | **५९८.७९** | **६७८.२७** |

| अ. क्र. | गावाची नावे | बागायत क्षेत्र हेक्टर | जिरायत क्षेत्र हेक्टर | मुख्य व्यवसाय | प्रमुख पिके |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | ५०२ | १६५ | शेती | ऊस, द्राक्षे, ढबू मिरची |
| २ | अंकलखोप | १७७७ | १०१ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, भात इ. |
| ३ | कवठेपिरान | १२५४ | ५७० | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ४ | य. पा. वाडी | ७७ | ३३३ | शेती | ऊस, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ५ | माळवाडी | २४३ | २ | शेती | ऊस, सोयाबीन, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ६ | भिलवडी | २३९२ | १०८ | शेती | ऊस, सोयाबीन, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ७ | राडेवाडी | २१० | | शेती, दुग्ध व्यवसाय | ऊस, ज्वारी, बाजरी, केळी, सूर्यफूल, भात इ. |
| ८ | आरवडे | ७०० | ५६५ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ९ | ऐतवडे खुर्द | १०४२ | -- | शेती | ऊस, भुईमुग, बाजरी, केळी, भाजीपाला, भात इ. |
| १० | गोटखिंडी | ११७९ | ७३५ | शेती | ऊस, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| ११ | सांगोले | १५० | १२५ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, इ. |
| १२ | भिलवडी स्टेशन | ४७ | ८ | शेती | ऊस, सोयाबीन, ज्वारी, सूर्यफूल, भात इ. |
| १३ | कोरेगाव | ५८४ | | शेती, दुग्ध व्यवसाय | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| १४ | नागेवाडी | २५ | २३० | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| १५ | सूर्यगाव | २१२ | | शेती, दुग्ध व्यवसाय | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भात इ. |
| १६ | कासलिंगवाडी | ५० | २८५ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| १७ | मजरे कार्वे | ६२ | १८९ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| १८ | दत्तवाड | ९७१ | ५६३ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, इ. |
| १९ | सडोली खालसा | २२३ | २२७ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, केळी, भाजीपाला, भात इ. |
| २० | बहिरेवाडी | ९७ | २५० | शेती | ऊस, भुईमुग, ज्वारी, केळी, भाजीपाला, भात इ. |
| २१ | आमशी | १३० | ४६० | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, भाजीपाला, भात इ. |
| २२ | चंद्रे | १८५ | २१४ | शेती, दुग्ध व्यवसाय | ऊस, सोयाबीन, भुईमुग, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| २३ | मजरेवाडी | १३१ | २२५ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, भाजीपाला, भात इ. |
| २४ | मडिलगे खुर्द | २१४ | ३३ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, केळी, सूर्यफूल, भात इ. |
| २५ | जैन्याळ | १० | ३७४ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| २६ | सावते | | | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, ज्वारी, बाजरी, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| २७ | जाखले | ७२२ | | शेती | ऊस, केळी, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |

| अ. क्र. | गावाची नावे | बागायत क्षेत्र हेक्टर | जिरायत क्षेत्र हेक्टर | मुख्य व्यवसाय | प्रमुख पिके |
|---|---|---|---|---|---|
| २८ | निलेवाडी | १२० | | शेती | ऊस, सोयाबीन, भाजीपाला, सूर्यफूल, भात इ. |
| २९ | कांबळवाडी | २३ | १२९ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, केळी, भाजीपाला, भात इ. |
| ३० | कुंभारवाडी | | | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, भात इ. |
| ३१ | शिवणगे | २३ | २५१ | शेती | ऊस, भुईमुग, भात इ. |
| ३२ | माजगांव | १०६ | ८० | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, भात इ. |
| ३३ | शेळकेवाडी | ७७ | ३ | शेती | ऊस, सोयाबीन, भुईमुग, केळी, भाजीपाला, भात इ. |
| | एकूण | १३५३८ | ६२२५ | | |
| | सरासरी | **४१०.२४** | **१८८.६४** | | |

| अ. क्र. | गावाची नावे | शेतीसाठी पाणी पुरवठा साधने | पिण्याच्या पाण्याची सोय | कुपनलिका | अंगणवाडी | जि. प. प्राथमिक शाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १८ | ५ | ३ |
| २ | अंकलखोप | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ७ | १० | २ |
| ३ | कवठेपिरान | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ३१ | १० | २ |
| ४ | य. पा. वाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| ५ | माळवाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ६ | १ | १ |
| ६ | भिलवडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ५ | १० | ५ |
| ७ | राडेवाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| ८ | आरवडे | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १४ | ३ | १ |
| ९ | ऐतवडे खुर्द | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | २ | | १ |
| १० | गोटखिंडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १२ | ७ | २ |
| ११ | सांगोले | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ८ | १ | १ |
| १२ | भिलवडी स्टेशन | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ४६ | २ | १ |
| १३ | कोरेगाव | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | २२ | ५ | २ |
| १४ | नागेवाडी | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ११ | १ | १ |
| १५ | सूर्यगाव | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ३ | १ | १ |
| १६ | कासर्लिंगवाडी | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ६ | १ | १ |

| अ. क्र. | गावाची नावे | शेतीसाठी पाणी पुरवठा साधने | पिण्याच्या पाण्याची सोय | कुपनलिका | अंगणवाडी | जि. प. प्राथमिक शाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | मजरे कार्वे | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ६ | १ | १ |
| १८ | दत्तवाड | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | २७ | ८ | ४ |
| १९ | सडोली खालसा | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | ५ | १ |
| २० | बहिरेवाडी | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १३ | ३ | १ |
| २१ | आमशी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ४०० | ४ | १ |
| २२ | चंद्रे | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | ३ | १ |
| २३ | मजरेवाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ७ | २ | १ |
| २४ | मडिलगे खुर्द | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | २ | १ | १ |
| २५ | जैन्याळ | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १२ | १ | १ |
| २६ | सावते | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| २७ | जाखले | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ९ | ३ | १ |
| २८ | निलेवाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ४ | २ | १ |
| २९ | कांबळवाडी | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| ३० | कुंभारवाडी | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| ३१ | शिवणगे | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | १२० | १ | १ |
| ३२ | माजगांव | नदी, विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | ८ | २ | १ |
| ३३ | शेळकेवाडी | विहीरी, विद्युत पंप, उपसा सिंचन | नळपाणी पुरवठा योजना | | १ | १ |
| | एकूण | | | ७९९ | ९९ | ४६ |
| | सरासरी | | | **२४.२१** | **३.००** | **१.३९** |

| अ. क्र. | गावाची नावे | हायस्कूल | कनिष्ठ महाविद्यालय | वरिष्ठ महाविद्यालय | खाजगी दवाखाना | प्राथमिक आरोग्य केंद्र | ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | १ | | | ८ | १ | १ |
| २ | अंकलखोप | २ | | | १२ | १ | |
| ३ | कवठेपिरान | २ | | | ७ | १ | १ |
| ४ | य. पा. वाडी | १ | १ | | १ | | |
| ५ | माळवाडी | | | | १ | १ | १ |
| ६ | भिलवडी | १ | १ | १ | १५ | १ | |
| ७ | राडेवाडी | | | | २ | | |
| ८ | आरवडे | १ | | | ३ | १ | १ |
| ९ | ऐतवडे खुर्द | १ | १ | १ | ५ | १ | १ |
| १० | गोटखिंडी | १ | | | ४ | १ | |
| ११ | सांगोले | १ | | | | | १ |
| १२ | भिलवडी स्टेशन | | | | २ | | |
| १३ | कोरेगाव | १ | | | ३ | १ | |
| १४ | नागेवाडी | | | | १ | | |
| १५ | सूर्यगाव | | | | १ | | |
| १६ | कासलिंगवाडी | | | | | | |
| १७ | मजरे कार्वे | १ | १ | | ३ | | |
| १८ | दत्तवाड | १ | १ | | ५ | १ | १ |
| १९ | सडोली खालसा | १ | | | ३ | १ | |
| २० | बहिरेवाडी | | | | २ | १ | १ |
| २१ | आमशी | १ | | | २ | १ | |
| २२ | चंद्रे | १ | | | २ | | |
| २३ | मजरेवाडी | | | | २ | | |
| २४ | मडिलगे खुर्द | | | | १ | | |
| २५ | जैन्याळ | | | | १ | | १ |
| २६ | सावते | | | | २ | | |
| २७ | जाखले | १ | | | ३ | १ | |
| २८ | निलेवाडी | | | | २ | | |
| २९ | कांबळवाडी | १ | | | २ | | |
| ३० | कुंभारवाडी | | | | १ | | |
| ३१ | शिवणगे | १ | १ | | | | |
| ३२ | माजगांव | २ | | | २ | १ | |
| ३३ | शेळकेवाडी | | | | | | |
| | एकूण | २२ | ६ | २ | ९८ | १५ | ९ |
| | सरासरी | ०.६७ | ०.१८ | ०.०६ | २.९७ | ०.४५ | ०.२७ |

| अ. क्र. | गावाची नावे | ट्रॅक्टरची संख्या | खाजगी ट्रकची संख्या | बँका | पतसंस्था | सोसायटी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | १४ | २ | २ | ८ | १ |
| २ | अंकलखोप | ११३ | ३५ | ६ | १८ | १ |
| ३ | कवठेपिरान | ५२ | ३ | ३ | ३ | २ |
| ४ | य. पा. वाडी | ४ | ० | | | १ |
| ५ | माळवाडी | १६ | ० | | २ | |
| ६ | भिलवडी | २५ | ५ | ७ | १५ | २ |
| ७ | राडेवाडी | ८ | ० | | १ | |
| ८ | आरवडे | १५ | ५ | | ३ | १ |
| ९ | ऐतवडे खुर्द | ५० | १ | २ | ४ | ३ |
| १० | गोटखिंडी | ३० | ३ | २ | ५ | २ |
| ११ | सांगोले | ५ | ० | | | १ |
| १२ | भिलवडी स्टेशन | ७ | १५ | १ | १ | १ |
| १३ | कोरेगाव | ६५ | ६५ | २ | ३ | ३ |
| १४ | नागेवाडी | १ | ० | | | |
| १५ | सूर्यगाव | ११ | १ | | २ | १ |
| १६ | कासलिंगवाडी | १ | ० | | | |
| १७ | मजरे कार्वे | ५ | २ | १ | ३ | १ |
| १८ | दत्तवाड | २५ | ४ | ३ | ७ | ४ |
| १९ | सडोली खालसा | ७२ | १६ | २ | २ | २ |
| २० | बहिरेवाडी | १५ | २० | | ३ | ३ |
| २१ | आमशी | ५ | | १ | २ | ४ |
| २२ | चंद्रे | १६ | ७ | | २ | ३ |
| २३ | मजरेवाडी | १० | २ | | १ | २ |
| २४ | मडिलगे खुर्द | १० | ५ | | १ | २ |
| २५ | जैन्याळ | ७ | | | २ | २ |
| २६ | सावते | ४ | | | १ | १ |
| २७ | जाखले | २० | | | ५ | १ |
| २८ | निलेवाडी | ५५ | २ | | २ | ५ |
| २९ | कांबळवाडी | | | | | |
| ३० | कुंभारवाडी | ५ | | | | १ |
| ३१ | शिवणगे | | | | १ | २ |
| ३२ | माजगांव | १७ | २ | | १ | ३ |
| ३३ | शेळकेवाडी | ७ | | | | २ |
| | एकूण | ६९० | १९५ | ३२ | ९८ | ५७ |
| | सरासरी | **२०.९१** | **५.९१** | **०.९७** | **२.९७** | **१.७३** |

| अ. क्र. | गावाची नावे | तरूण मंडळे | महिला मंडळ | युवती मंडळे | मंदिर |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | २४ | ५ | | ५ |
| २ | अंकलखोप | १५ | ७ | ४ | ९ |
| ३ | कवठेपिरान | ३० | १२ | ९ | ८ |
| ४ | य. पा. वाडी | १ | १ | १ | २ |
| ५ | माळवाडी | ६ | ४ | | ३ |
| ६ | मिलवडी | ३१ | ३ | ५ | ६ |
| ७ | राडेवाडी | ४ | १ | १ | १ |
| ८ | आरवडे | ७ | २ | | ९ |
| ९ | ऐतवडे खुर्द | २४ | ९ | | ११ |
| १० | गोटखिंडी | ११ | १ | | ५ |
| ११ | सांगोले | १ | १ | १ | ११ |
| १२ | मिलवडी स्टेशन | २ | ४ | | १ |
| १३ | कोरेगाव | १८ | २ | २ | ५ |
| १४ | नागेवाडी | १ | २ | | ३ |
| १५ | सूर्यगाव | ४ | १ | १ | ३ |
| १६ | कासर्लिंगवाडी | १ | ४ | १ | ३ |
| १७ | मजरे कार्वे | २ | १ | | १ |
| १८ | दत्तवाड | २० | २ | | १२ |
| १९ | सडोली खालसा | १८ | १ | | ९ |
| २० | बहिरेवाडी | १३ | १ | | ३ |
| २१ | आमशी | ७ | २ | | २ |
| २२ | चंद्रे | ५ | १६ | | २ |
| २३ | मजरेवाडी | ८ | १ | | ६ |
| २४ | मडिलगे खुर्द | ६ | १ | | ४ |
| २५ | जैन्याळ | ११ | १ | १ | ६ |
| २६ | सावते | ५ | १ | | ३ |
| २७ | जाखले | ५ | १ | | ५ |
| २८ | निलेवाडी | ८ | १ | | २ |
| २९ | कांबळवाडी | १० | ७ | | २ |
| ३० | कुंभारवाडी | ५ | १ | | १ |
| ३१ | शिवणगे | १ | १ | | ३ |
| ३२ | माजगांव | ७ | १ | | ६ |
| ३३ | शेळकेवाडी | १ | १ | | १ |
| | एकूण | ३१२ | ९९ | २६ | १५३ |
| | सरासरी | ९.४५ | ३.०० | ०.७९ | ४.६४ |

| अ. क्र. | गावाची नावे | बायोगॅस संख्या | सार्वजनिक शौचालय | वैयक्तिक शौचायल | सोलर कुकर |
|---|---|---|---|---|---|
| १ | तुंग | १४२ | ५२ | ७७६ | १०७ |
| २ | अंकलखोप | १५० | १०० | १५०० | २५ |
| ३ | कवठेपिरान | १३१ | १८ | १६५० | २२ |
| ४ | य. पा. वाडी | १३ | ४ | २१७ | ३ |
| ५ | माळवाडी | १ | ९ | २४० | ४ |
| ६ | भिलवडी | ३५ | १९ | १५४५ | ५ |
| ७ | राडेवाडी | ४२ | | १३० | ५ |
| ८ | आरवडे | ५५ | ६ | ३४५ | ५ |
| ९ | ऐतवडे खुर्द | १४७ | ७५ | ८४९ | ८ |
| १० | गोटखिंडी | १६० | ३ | ६८९ | ३ |
| ११ | सांगोले | ४ | ८ | १४९ | २ |
| १२ | भिलवडी स्टेशन | ० | ६ | १०० | ६ |
| १३ | कोरेगाव | ४५२ | ३ | ८१२ | ३ |
| १४ | नागेवाडी | २ | १ | १४६ | ० |
| १५ | सूर्यगाव | ३८ | २ | १६५ | ५ |
| १६ | कासलिंगवाडी | १ | ८ | १०० | ० |
| १७ | मजरे कार्वे | ३६ | २ | १३५ | ० |
| १८ | दत्तवाड | २३६ | ८ | ८५६ | ० |
| १९ | सडोली खालसा | ४५६ | ११ | ० | ० |
| २० | बहिरेवाडी | ९० | ६ | ५०० | ० |
| २१ | आमशी | २५६ | १० | ३०५ | ० |
| २२ | चंद्रे | २६० | | २९० | ० |
| २३ | मजरेवाडी | ५ | १७ | १६५ | ० |
| २४ | मडिलगे खुर्द | २०४ | १८ | २३९ | २ |
| २५ | जैन्याळ | ६१ | ३ | २४६ | ० |
| २६ | सावते | ३५ | १० | २०३ | ० |
| २७ | जाखले | १३७ | ३० | ६११ | १ |
| २८ | निलेवाडी | १७९ | | २८५ | ० |
| २९ | कांबळवाडी | १०५ | ८ | १२९ | ० |
| ३० | कुंभारवाडी | ४१ | | १३२ | ० |
| ३१ | शिवणगे | १०४ | २१ | १४१ | ० |
| ३२ | माजगांव | २३५ | २ | ३४३ | ० |
| ३३ | शेळकेवाडी | ६५ | ४ | ६५ | ० |
| | एकूण | ३८७८ | ४६४ | १४०५८ | २०६ |
| | सरासरी | **११७.५२** | **१४.०६** | **४२६.००** | **६.२४** |

(टीप : सन २००३-०४ मध्ये मुसळवाडी गावचा तृतीय क्रमांक आला होता. त्या गावची सर्वसाधारण माहिती उपलब्ध झालेली नाही.)

सारणी क्रमांक ३.१ मधील सादर केलेल्या माहितीवरून असे दिसून येते की,

१. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३ पारितोषिक विजेत्या गावातील एकूण लोकसंख्येची सरासरी ३३०४.९ इतकी आहे. सरासरी लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असणा-या गावाचा समावेश हा मोठ्या प्रमाणात म्हणजे ६३.६३ टक्के आहे. दुस-या शब्दात, आकाराने सापेक्षतः लहान असणारी गावे अभियानातंर्गत स्पर्धेत यशस्वी होताना दिसतात.

२. २००१ च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्र राज्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर (Sex Ratio) म्हणजे दर १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२२ इतकी होती. या पार्श्वभूमीवर पाहिले असता, पारितोषिक प्राप्त ३३ गावातील स्त्री-पुरुष सरासरी गुणोत्तर ९७१ इतके आहे असे दिसून येते. ३३ गावांपैकी केवळ एका गावात हे प्रमाण ९२२ पेक्षा कमी आहे. पुरस्कार प्राप्त गावातील दर हजार पुरुषांमागील स्त्रियांचे प्रमाण महाराष्ट्राच्या तुलनेत ४९ ने अधिक आहे. याचा अर्थ पारितोषिक प्राप्त गावात स्त्रियांचे प्रमाण सापेक्षतः चांगले असून स्त्रियांच्या दृष्टीने पोषक वातावरण आहे.

३. सांगली जिल्ह्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर १०००:९७८ इतके आहे. सांगली जिल्ह्यातील १६ गावापैकी ७ गावात स्त्री-पुरुष प्रमाण जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. या सात गावापैकी, यमाजी पाटलाची वाडी, माळवाडी, सांगोले, आरवडे या चार गावात स्त्रियांचे प्रमाण १००० पेक्षा अधिक आहे.

४. कोल्हापूर जिल्ह्यात स्त्री-पुरुष गुणोत्तर १००० : ९४९ आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील १७ गावापैकी १५ गावात दर हजार पुरुषांमागील स्त्रियांचे प्रमाण जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा (९४९) अधिक आहे. जैन्याळ, जाखले,

शिवणगे व शेळकेवाडी या ४ गावात स्त्रियांची संख्या १००० हून अधिक आहे.

५. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त गावातील कुटुंबांची सरासरी संख्या ५५८.७९ इतकी आहे. पुरस्कार प्राप्त ३३ गावापैकी २१ गावातील कुटुंबांची संख्या सरासरीपेक्षा कमी आहे. म्हणजे अभियानात लहान गावे अधिक प्रमाणात यशस्वी होताना दिसतात.

६. पुरस्कार प्राप्त गावांचे सरासरी भौगोलिक क्षेत्र ६७८.२७ हेक्टर इतके आहे. २२ गावाचे भौगोलिक क्षेत्र सरासरी भौगोलिक क्षेत्रापेक्षा कमी आहे.

७. पुरस्कार प्राप्त गावातील सरासरी बागायत क्षेत्र ४१०.२४ हेक्टर इतके आहे. ३३ गावांपैकी २४ गावात बागायती क्षेत्र सरासरीपेक्षा खूप कमी असल्याचे दिसते. याचा अर्थ ढोबळ अर्थाने जी गावे सापेक्षत: कमी सधन आहेत अशी गावे सदर अभियानात यशस्वी होताना दिसतात.

८. सर्व गावात शेती हाच गावांचा प्रमुख व्यवसाय असून शेतीतील मुख्य पीक ऊस हे आहे ऊसाशिवाय दोन्ही जिल्ह्यात भात, सोयाबीन, भुईमूग, भाजीपाला, केळी, द्राक्षे अशी इतर पिकेही घेतली जातात.

९. बहुसंख्य गावात पिण्याच्या पाण्याची सोय नळपाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून केलेली आहे. शेतीसाठी पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून केलेली आहे. शेतीसाठी पाणी पुरवठा विहीरी, नदी, कालवे, बोअरवेल्स यांच्या माध्यमातून होतो.

१०. या गावातील कुपनलिकांची सरासरी २४.२१ इतकी आहे. २० गावामध्ये कुपनलिकांची संख्या कमी आहे. शिवाय ८ गावात एकही कुपनलिका नाही.

११. सर्व पुरस्कारप्राप्त गावात पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाची सोय आहे. बहुसंख्य गावात अंगणवाडी व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आहे. अंगणवाडीची सरासरी ३ इतकी आहे. जिल्हापरिषद प्राथमिक

शाळेची सरासरी १.३९ इतकी आहे. बहुसंख्य गावात हायस्कूलची सोय नाही अशा गावांची संख्या १४ इतकी आहे.

१२. कनिष्ठ महाविद्यालयाची सोय ६ गावात आहे तर वरिष्ठ महाविद्यालय केवळ दोनच गावात आहे.

१३. सर्व गावातील खाजगी दवाखान्याची सरासरी संख्या २.९७ इतकी आहे. केवळ चार गावात खाजगी दवाखाने नाहीत.

१४. प्राथमिक ग्रामीण आरोग्य केंद्रे १५ गावात आहेत. ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्रे केवळ एका गावातच आहेत.

१५. १२ गावात बँकाची सोय आहे. बहुसंख्य गावात बँकाची सोय नसली तरी पतसंस्था व सोसायटी यांचे प्रमाण चांगले आहे.

१६. सर्व गावात तरूण मंडळे व महिला मंडळे असून, तरूण मंडळांची सरासरी ९.४५ इतकी असून महिला मंडळांची सरासरी ३ इतकी आहे. परंतु युवती मंडळाची सरासरी केवळ ०.७९ इतकी आहे. केवळ १० च गावात युवती मंडळे असल्याचे दिसते.

१७. धार्मिक मंदीरांचे सरासरी प्रमाण ४.६४ इतके असून १५ गावात मंदीरांची संख्या सरासरीहून अधिक आहे.

१८. बायोगॅसची सरासरी संख्या ११७.५२ असून १४ गावात सरासरीपेक्षा अधिक बायोगॅसची संख्या आहे. याचा अर्थ पारितोषिक प्राप्त गावांमधून अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढत आहे असे सूचित होते.

१९. सार्वजनिक शौचालयांची सरासरी १४.०६ इतकी असून ९ गावात सरासरीपेक्षा अधिक सार्वजनिक शौचालयांची संख्या आहे. २० वैयक्तिक शौचालयांची सरासरी ४२६ इतकी आहे. १० गावात सरासरीपेक्षा अधिक प्रमाणात शौचालयाची संख्या आहे. या अभियानांतर्गत शौचालयांची उपलब्धता व वापर यावर विशेष भर दिला

जात असल्याने १०० टक्के लोकांना शौचालये उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे दिसून येते.

# विभाग - २

## शेळकेवाडी आणि कोरेगाव या गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत शेळकेवाडी व कोरेगाव या प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी कशी केली आहे याचे विवेचन या विभागात करण्यात आले आहे. या दोन्ही गावांना दिलेल्या भेटी, तेथील लोकांशी केलेली चर्चा आणि गावातील अभियानाच्या अंमलबजावणी विषयीचा अहवाल यावर आधारित विवेचन खालीलप्रमाणे -

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत कोरेगाव व शेळकेवाडी गावात राबविलेले कार्यक्रम खालीलप्रमाणे -

**१. महिला ग्रामसभा**

**१. कोरेगाव**

१ ऑक्टोबर २००६ रोजी सकाळी महिला ग्रामसभा घेण्यात आली व संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविणेचे ठरले.

**२. शेळकेवाडी**

१ ऑक्टोबर रोजी सकाळी शेळकेवाडी ग्रामपंचायतीची मासिक सभा घेणेत आली व सदर सभेमध्ये संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासंबंधीचे परिपत्रक वाचून दाखविणे आले. सर्व महिलांनी मिळून अभियान यशस्वीपणे राबविणचे ठरविले.

**२. ग्रामसभा**

**१. कोरेगाव**

२ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.०० वाजता राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती साजरी केली. तसेच संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे

पूजन करणेत आले. त्यानंतर लगेचच ग्रामसभा घेणेत आली. ग्रामसेवक यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व स्वच्छ ग्राम स्पर्धेविषयी शासन निर्णयाची माहिती दिली. सर्वांनी एकमुखाने स्वच्छता अभियान राबविण्याचे व स्पर्धेत भाग घेवून यश संपादन करण्याचा ठराव केला. यानंतर सर्वांनी तात्काळ हनुमान मंदिराच्या चौकातून स्वच्छतेला सुरूवात केली.

२. **शेळकेवाडी**

महाराष्ट्र शासनाचे अभियान उपक्रमानुसार गावामध्ये सभा आयोजित केली होती. सदर सभेस गावातील आबालवृध्द/शिक्षक/विद्यार्थी/पदाधिकारी/महिला हजर होत्या. सदरची ग्रामसभा ही संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाबाबतची असल्याने सदर योजनेचे महत्त्व ग्रामस्थांना पटवून देण्यात आले. या सभेत स्वच्छता अभियान समिती स्थापन करण्यात आली. सदर सभेस २५० ग्रामस्थ उपस्थित होतें. ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत कोणती विकास कामे राबवून गावाचा विकास करता येईल यावर चर्चा झाली. अशा प्रकारे अभियानास सुरूवात झाली.

२. **ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहीम**

१. **कोरेगाव**

दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी गावातील सर्व युवक मंडळे, बचत गटातील महिला, महिला मंडळे, ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, अंगणवाडी कार्यकर्त्या एकत्रित जमून प्रभागवार कामांचे नियोजन करणेत आले. सर्व युवक मंडळांच्या कार्यकर्त्यांनी प्रभाग क्रमांक २ व प्रभाग क्रमांक ३ मधील गटारी स्वच्छ केल्या. गाजर गवत काढले, गटारातील काढलेली घाण व संपूर्ण कचरा ट्रॅक्टरच्या व कचरागाडीच्या साहाय्याने गावाबाहेरील कंपोस्ट खड्यात नेवून टाकला. महिलांच्या मदतीने सर्व रस्ते झाडून स्वच्छ केले.

२. **शेळकेवाडी**

दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी सकाळी गावातून ठीक १०.०० वाजता प्रभातफेरी काढण्यात आली. गावातील सर्व महिला/विद्यार्थी व तरूण मंडळ व इतर सर्वजण मिळून गल्लोगल्ली साठलेला कचरा सफाई करून ग्रामपंचायत आवार, हनुमान मंदिर परिसर,

दूध संस्था परिसर आदि ठिकाणी सर्वांनी मिळून रस्ते व परिसर स्वच्छ करण्यात आले व जमलेला कचरा ट्रॅक्टरमधून गावाबाहेरील शोषखड्डयात टाकण्यात आला. सदर कामासाठी ५०९ ग्रामस्थ उपस्थित होते.

**४. शोषखड्डयांची स्वच्छता व बांधकाम जागृती मोहीम**

**१. कोरेगाव**

गावातील एकूण ५५ घरांना शोषखड्डयाची आवश्यकता होती. दि. ५ व ६ ऑक्टोबर रोजी त्यासाठी परिसरातील व संबंधित कुटुंबातील लोकांना बोलावून त्याबाबत प्रात्यक्षिक व तांत्रिक माहिती देणेत आली. शोषखड्डयाजवळ झाडे लावणेची कल्पना दिली. एक शोषखड्डा ५ ते ६ व्यक्तींच्या कुटुंबाकरीता १० वर्षे काम करीत असल्याचे माहिती मिळाली.

**२. शेळकेवाडी**

गावातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी ठरल्याप्रमाणे सकाळी १०.०० वाजता ग्रामस्थ, ग्रामपंचायतीजवळ जमा झाले. ज्या ठिकाणी आवश्यकता आहे त्या ठिकाणी शोषखड्डा काढण्यात आला. आरोग्यदायी जीवन जगण्याचा संदेश लोकांना दिला. त्या दिवशी (दि. ५ व ६ ऑक्टोबर) एकूण ६ शोषखड्डे काढण्यात आले.

**५. शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहीम**

**१. कोरेगाव**

दि. ७ व ८ ऑक्टोबर रोजी स्वच्छता अभियानाच्या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलांची शाळा नं. १ व जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलांची शाळा नं. २, पंचक्रोशी इंग्लिश स्कूल, कोरेगाव व अंगणवाडीमधील सर्व विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा घेवून त्यांना संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या कार्याची माहिती दिली. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसराची, वर्गाची व स्वच्छतागृहांची स्वच्छता केली. शाळेचा परिसर स्वच्छ राहिल्यास आनंददायी वातावरण निर्माण होवून मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होते हे पटवून दिले. तसेच सर्व विद्यार्थ्यांना अभियानामध्ये सक्रिय सहभाग घेणेबाबत मार्गदर्शन केले. आरोग्याचे सहा संदेश पोहाचविणेबाबत व

जनजागृती करण्याबाबत व आपली शाळा स्वच्छ ठेवण्याबाबतचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. सार्वजनिक इमारती, ग्रामपंचायत इ. परिसर व इमारतींची स्वच्छता करण्यात आली.

२. **शेळकेवाडी**

सर्व ग्रामस्थ, विद्यामंदिर शेळकेवाडी येथे शाळेच्या आवारात हजर झाले. सर्वांनी मिळून शाळेचा आवार, पाणी पुरवठा संस्था आवार व परिसर स्वच्छ करून जमा केलेला केरकचरा कंपोस्ट खड्ड्यात टाकण्यात आला. सदर कामासाठी ५५० लोंक हजर होते. यात महिलांचे योगदान मोठे होते.

६. **घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहीम**

१. **कोरेगाव**

दि. ९ व १० ऑक्टोबर, गावातील प्रत्येक घरात स्वच्छतेचे महत्त्व पटवून देण्याकरीता प्रत्येक घराघरात जावून तरूण मंडळानी जाहिरातीद्वारे स्वच्छतेचे संदेश दिले. प्रामुख्याने घराच्या स्वच्छतेचे महत्त्व व परिसर स्वच्छता पाणी व अन्नधान्याची योग्य रितीने साठवणूक याबाबत माहिती दिली. संपूर्ण गावामध्ये स्वच्छ घर व सुंदर घर स्पर्धा घेण्यात आल्या.

२. **शेळकेवाडी**

मन करा रे प्रसन्न । सर्व सिध्दीचे कारण । या उक्तीप्रमाणे मन प्रसन्नतेसाठी गावभर स्वच्छतेच्या जनजागृतीचा नगारा वाजला व घरोघरी स्वच्छतेचा कार्यक्रम सुरू झाला. प्रथम गावातील गल्ल्यांचा परिसर स्वच्छ करण्यात आला. त्यानंतर ग्रामपंचायत कार्यालय, गावातील संपूर्ण देवालये स्वच्छ झाली. बघता बघता गावातील घराघरांत स्वच्छता झाली आणि घर परिसर स्वच्छ व सुंदर दिसू लागले.

७. **स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिक, प्रचार, प्रसिध्दी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्यक्षिके**

१. **कोरेगाव**

दि. ११ व १२ ऑक्टोबर, स्वच्छता विषयक साहित्याचे प्रदर्शन घेण्यात आले. प्रदर्शनातील प्रत्येक साहित्याचे स्वच्छतेच्या संदर्भात असणारे महत्त्व विशद करण्यात आले. दलित वस्तीमध्ये घरटी एक झाड याप्रमाणे सर्वांनी वृक्षारोपण केले. सदर दिवशी पिण्याच्या पाण्याच्या स्वच्छतेविषयी महत्त्व पटवून देऊन ५०० वगराळ्यांचे वाटप करण्यात आले.

**२. शेळकेवाडी**

स्वच्छता विषयक साहित्य प्रदर्शनाचा कार्यक्रम ग्रामपंचायतीच्या पटांगणात घेण्यात आला. आपले शौचालय स्वच्छ ठेवण्यासाठी वापरण्यात येणा-या रसायनाची माहिती देऊन प्रात्यक्षिके दाखविली. यावेळी स्वच्छतेचे महत्त्व सांगताना शौचालयास जाऊन आल्यानंतर आपले हात साबणाने स्वच्छ धुणे, अंघोळीच्या वेळी साबण, जेवणापूर्वी हात साबणाने धुणे, इ. किती अत्यावश्यक आहे याचे महत्त्व सांगितले. तसेच पिण्याचे पाणी झाकून ठेवणे तसेच टी. सी. एल. युक्त पाणी पिणे आवश्यक आहे असे सांगितले.

**८. शौचालय दुरुस्ती/बांधकाम अभियान मोहीम**

**१. कोरेगाव**

दि. १३ व १४ ऑक्टोबर, कोरेगाव निर्मल ग्राम करणेचा ठराव करण्यात आला. उघड्यावर शौचविधी केल्यामुळे मानवी विष्ठेद्वारे जलस्त्रोत दूषित होतात, रोगजंतूंचा फैलाव जलदगतीने होते, म्हणून ही प्रथा बंद करून त्याएवेजी १०० टक्के घरांना वैयक्तिक शौचालय बांधून त्याचा वापर करण्याचे नियोजन करण्यात आले. ८४० कुटुंबापैकी ७०० शौचालये पूर्ण झालेली होती. अभियानकाळामध्ये ४१ शौचालये पूर्ण करणेत आली व ९९ शौचालयाचे बांधकाम करणेचे नियोजन करणेत आले.

**२. शेळकेवाडी**

शौचालयाचा वापर व स्वच्छता कशी राखावी यासाठी उद्‌बोधन वर्ग घेऊन प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. शौचालयाचे बांधकाम कमी रक्कमेत कसे करावे याचे प्रशिक्षण गावातील गवंड्यांना दिले गेले. एक घर एक शौचालय याप्रमाणे प्रत्येकाने शौचालय बांधावयाचे निश्चित केले. सर्व ग्रामस्थांनी आपआपले शौचालय

अभियानकाळात पूर्ण करण्याचा संकल्प केला. तसेच शौचालय स्वच्छता व डागडुजी करण्यात आली.

**९. पाणी शुध्दता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहीम**

**१. कोरेगाव**

दूषित पाणी पिण्यासाठी वापरल्यास हगवण, कॉलरा, टायफॉईड आणि कावीळ यासारखे रोग होतात. यासाठी स्वच्छतेच्या दृष्टीने पाणी साठविण्यापासून वापरापर्यंत सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने सदर दिवशी पाणी शुध्द करण्याच्या घरगुती पध्दतीचे प्रात्यक्षिक दाखविणेत आले. सर्वसाधारणपणे १० लिटर पाण्यामध्ये क्लोरीनचा १ थेंब टाकून पाणी वापरावे. एक माठ पाण्यामध्ये क्लोरीन द्रावणाचे देन थेंब टाकण्याचे प्रात्यक्षिक दाखविणेत आले.

**२. शेळकेवाडी**

सार्वजनिक पाण्याच्या टाकीमध्ये टी. सी. एल. पावडर योग्य प्रमाणावर व वेळेवर, नियमित टाकण्याची कार्यवाही सुरू केली. पिण्याच्या पाण्याच्या विहीरींची व नळपाणी पुरवठा योजनेची स्वच्छता केली. पाणी हेच जीवन । पाणी हीच शुध्दता ही तितकीच महत्त्वाची आहे. एक गाव, एक पाणवठा याप्रमाणे गावातील पाणी पुरवठ्याच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष दिले जाते.

**१०. वैयक्तिक स्वच्छता जागृती**

**१. कोरेगाव**

अनेक रोग स्वत:च्या शारीरिक अस्वच्छतेमुळे होतात. नियमितपणे हात धुणे व नखे कापणे यासारख्या सवयीमुळे हगवणीसारखे रोग टाळता येतात. कातडी स्वच्छ केली नाही तर कातड्याचे रोग होवू शकतात. त्वचेचे रोग स्पर्श कपडे किंवा पांघरूणाद्वारे पसरतात. दात नियमित घासले नाहीत तर अन्नाचे कण, दातामध्ये घट्ट बसलेले कण सडल्यानंतर दात दुखणे, किडण्याचे प्रकार सुरू होतात. केसांची निगा न राखल्यास केस गळतात व केसांमध्ये उवा होतात. यासंबंधी वैयक्तिक स्वच्छतेचे महत्त्व नागरिकांना पटवून दिले. त्यामध्ये साबण किंवा राखेणे हात धुणे, शिकाकाई व शांपू

याने केस धुणे, प्रत्येक आठवड्यातून एक वेळा नेलकटरने नखे कापणे, उवा निर्मूलनासाठी लायसिलचा वापर करणे इ. बाबतची माहिती व यासंबंधीची लिपलेट वाटून प्रबोधन करण्यात आले.

**२. शेळकेवाडी**

निरोगी शरीरात निरोगी मन वास करते. वैयक्तिक आरोग्य हीच आपली दौलत असे सुविचार आणि ग्रामीण जीवनात त्यांचा अर्थ आणि महत्त्व स्पष्ट करून दि. १७ व १८ ऑक्टोबर या दिवशी ग्रामस्थांना पटवून देण्यात आले. डोक्यावरील केसातील अस्वच्छतेमुळे उवा तयार होऊन रोगबाधा होऊ शकते. म्हणूनच वेळेवर केस कापणे आरोगयाला हितकारक आहे. हे पटल्यामुळे सर्व लहान मुलांनी केस कापून घेऊन केसांची निगा राखण्यासाठी प्रतिज्ञा केली. केसातील अस्वच्छतेमुळे जटा धरतात आणि जटाधारी मुलीचे सौंदर्य लोप पावते. त्यामुळे मुलीचे जीवन निराशामय होते. त्यासाठी स्वच्छ आरोग्य, दररोज आंघोळ, वेळोवेळी केस व नखे कापणे या सवयी मुलांना लावण्यात आल्या.

**११. रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहीम**

**१. कोरेगाव**

सदर दिवशी वॉर्ड नं. १ मधील सर्व रस्त्यांची व गटारांची स्वच्छता करून घेणेत आली. सर्व गटारांमधून पाणी वाहत राहील अशी व्यवस्था केली. वॉर्ड नं. २ मधील पाण्याच्या टाकीच्या परिसरातील गाजर गवत काढून घेतले. तेथील स्वच्छतेविषयीचे महत्त्व पटवून दिले. प्रत्येकाने घरोघरी फिरून स्वच्छता व श्रमदान याबाबतचे महत्त्व पटवून दिले. वॉर्ड नं. ३ मधील दलित वस्ती मधील सर्व रस्त् व गटारे यांची स्वच्छता करण्यात आली. प्रत्येकास घरटी एक झाड लावणेस प्रवृत्त करून घरटी एक झाड लावून घेतले. वॉर्ड नं. ४ मध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देवून प्रत्येकाच्या घरी जाऊन स्वच्छतेचे सहा संदेश समजावून सांगितले व त्याप्रमाणे आपल्या दिनचर्येत अनुकरण करणेस सांगितले.

**२. शेळकेवाडी**

सदर दिवशी श्रमदानातून रस्त्यांच्या दुतर्फा वाढलेल्या रानवेली, झुडपे, घाणेरी काढून रस्ते स्वच्छ केले. याबरोबर गावातील रस्त्यातील खाचखळगे मुरूम टाकून दुरूत केले. श्रमदानामुळे गावातील रस्ते दुरूस्त झाले. स्वच्छ रस्ते पाहून त्याचा आनंद महिला व गावक-यांच्या चेह-यावर ओसंडून वाहत होता.

**१२. जनावरे स्वच्छता मोहीम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावरे स्पर्धा**

**१. कोरेगाव**

जनावरांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी व त्यांची योग्य रितीने स्वच्छता करण्यासाठी अभियान काळात सदर दिवशी खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविणेत आले.

१. आदर्श गोठा स्पर्धा, २. स्वच्छ व सदृढ जनावरे स्पर्धा. शिवाय सदर दिवशी १५० जनावरांचे गोचडी निर्मूलन करणेत आले. त्याचप्रमाणे शिबीरामध्ये ७७ वांझ जनावरांची तपासणी करणेत आली व त्यावर उपचार करणेत आले.

**२. शेळकेवाडी**

"जनावरे शेतक-यांचा खरा मित्र" असल्यामुळे जनावरांना साथीचे रोग होऊ नयेत यासाठी जनावरांचे आरोग्य शिबीर घेतले. त्यामध्ये लसीकरण, जनावरांची काळजी कशी घ्यावी, विशेष करून जनावरांचे गोठे, त्यांच्या मलमूत्राची विल्हेवाट, गोठे निर्जंतूकीकरण आदीबाबत माहिती सांगितली. यावेळी सर्वांनी आपली जनावरे स्वच्छ धुतली. जनावरांची तपासणी करण्यात आली. स्वच्छता प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

**१३. वृक्ष संवर्धन, परसबाग अपारंपरिक ऊर्जा संरक्षण मोहीम**

**१. कोरेगाव**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्ष संगोपन व संवर्धन करणे अत्यंत आवश्यक असल्याने या बाबीचे महत्त्व ग्रामस्थांना पटवून देवून, रस्त्याच्या दुतर्फा त्याचप्रमाणे दक्षिण बाजूस असलेल्या तळ्यामध्ये, शाळेच्या आवारामध्ये, ग्रामपांयत समोरील सार्वजनिक जागेवर १२४५ गोल्डन ड्युरांडा, ३२६ आवळा, ५१४ रातराणी, ५०३ एक्झोरा, १४८ गुंज, ४८९ अंजिर, २०० सिमारोह व १४७ पुत्रवती इ. रोपे लावण्यात आली. दलित वस्तीमध्ये ७४५० रोपांची लागवड करण्यात आली. परसबागेत

लावणेसाठी ४३९ कुटुंबाना विविध भाजीपाला व फळभाज्या यांच्या बियाणांच्या पाकिटांचे वाटप करणेत आले. गावामध्ये ८४० कुटुंबापैकी ४५२ कुटुंबानी शौचालयास जोडून बायोगॅस सयंत्र बांधून घेतले आहे. पैकी अभियान काळात २५ बायोगॅस संयत्रे बांधण्यात आली. तसेच सौर लाईट ७, सौर कंदील १०, सौर चुली ३ बसविण्यात आल्या.

**२. शेळकेवाडी**

गावातील तरूण मंडळ व महिलांनी एकत्र येऊन शाळेच्या पाठीमागील परसबागेची स्वच्छता व संवर्धन केले. सर्व नागरिकांनी आपआपल्या दारात रोपटे लावून गावाच्या सौंदर्यात व अभियानात भर टाकली.

**१४. गावात स्लोगन स्पर्धा (घोषवाक्य), निबंध स्पर्धा, व्यसनमुक्ती**

**१. कोरेगाव**

प्राथमिक मराठी मुलांची शाळा नं. १ व प्राथमिक मराठी मुलींची शाळा नं. २ यामध्ये वेगवेगळे गट पाडून संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाच्या अंतर्गत स्लोगन स्पर्धा, निबंध स्पर्धा, वक्तृत्त्व स्पर्धांचे आयोजन करणेत आले. स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भाग घेवून ग्रामस्वच्छता अभियान, स्वच्छ व शुध्द पाणी, वैयक्तिक स्वच्छता, पर्यावरण, वृक्षारोपण इ. वर स्लोगन व निबंध यांचे माध्यमातून विचार व्यक्त केले. स्पर्धकांना स्वच्छता विषयक साहित्याचे बक्षिस देवून गौरव करणेत आला.

गावामध्ये कोणत्याही प्रकारच्या दारू विक्रीचे दुकान नाही. तसेच सर्व किराणा दुकानदार, पानशॉपधारक यांना ग्रामसभेच्या ठरावाची कल्पना देवून गुटखा विक्री बंदीची अंमलबजावणी करणेत आली आहे.

**२. शेळकेवाडी**

प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी संत गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर आधारित निबंध स्पर्धा ठेवण्यात आल्या. स्वच्छतेचे महत्त्व कळण्यासाठी व अंतःकरणात रूजण्यासाठी गावातून शाळेच्या विद्यार्थ्यांना घेऊन घोषवाक्ये देण्यात आली. ग्रामस्वच्छता अभियानावर आधारित घोषवाक्य स्पर्धा घेण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक यांचे मार्गदर्शन लाभले.

## १५. सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगापेन, रोगनिदान व साथरोग प्रतिबंध मोहीम

### १. कोरेगाव

वैद्यकीय अधिकारी यांचेमार्फत अंगणवाडीतील सर्व मुलांमुलींची आरोग्यविषयक तपासणी घेणेत आली. अंगणवाडीतील मुलांच्याकरीता सदृढ बालक स्पर्धा सदर दिवशी आयोजित करणेत आली. वैद्यकिय अधिकारी यांनी प्रथम तीन क्रमांकाची बक्षिसे मुलांमुलींसाठी काढून स्पर्धेत आलेल्या बालकांना बक्षिसे देण्यात आली. तसेच गरोदर मातांची तपासणी केली व बाळाला स्तनपान करणेचे महत्त्व व बालसंगोपनाविषयी माहिती देणेत आली. त्याचप्रमाणे गरोदर माता व बालसंगोपनाविषयी माहिती देणेत आली. तसेच त्यांच्या पोषक आहारासंबंधी माहिती देणेत आली.

### २. शेळकेवाडी

सदृढ बालकासाठी माता सुरक्षित असणे आवश्यक आहे. मुलांचे आरोग्य, मानसिक व शारीरिक वाढ, त्यांचा आहार समतोल राखणे हे मातेवर अवलंबून असते अशा सदृढ बालकांच्या मातांची तपासणी केली. बालकांचे वजन घेतले व लसीकरण करण्यात आले. त्यात पोलिओ ट्रिपल, बी.सी. जी. लस देण्यात आली. गावामध्ये अभियानकाळात सदृढ बालक स्पर्धा घेतल्या व मातांची तपासणी केली आणि सर्व रोगनिदान आरोग्य शिबीर घेतले.

## १६. गटारे, सांडपाणी निर्मूलन, सांडपाणी वापर मोहीम

### १. कोरेगाव

गावामध्ये ६००० मिटर लांबीची गटारे बांधलेली असून त्यापैकी ५०० मिटर गटार बंदिस्त आहेत. ७५७ घरांचे सांडपाणी गटारीस जोडून सांडपाण्याची व्यवस्था करणेत आली आहे. ५५ घरांना शोषखड्डयांची व्यवस्था करणेत आली आहे. उर्वरित सांडपाणी परसबागेमध्ये झाडे लावून वापर करणेत आला आहे.

गावाबाहेर पश्चिमेस २० x २० चा खड्डा काढणेत आला आहे व त्यामध्ये गटारामधील सर्व पाणी एकत्रित करून साठविणेत आले आहे. सदर सांडपाणी नजिकच्या शेतक-यांना वार्षिक नाममात्र २०० रू. भाडे घेणेत येवून शेतीवापरास देणेत आले आहे. सदरची रक्कम ग्रामपंचायतीस जमा करणेत येते.

**२. शेळकेवाडी**

गावातील सांडपाणी, नळयोजनेतील पाणी गळती, पावसाने साठलेल्या डब्क्यातील व रस्त्यातील पाणी साचून डासासारख्या उपद्रवी किटकांचे उपद्रव होऊन रोग पसरण्याची शक्यता जास्त असते. त्यासाठी हे पाणी उघड्यावर न सोडता गटारातून, सांडपाणी व्यवस्थापनामध्ये सोडणे आवश्यक आहे. यासाठी गावातील ग्रामस्थांनी गावात जेथे गटारी नाहीत तेथे गटारे बांधली, जेथे सांडपाणी साचते तेथे शोषखड्डे काढले व गप्पी माशांची पैदास करण्यात आली.

**१७. संकल्प दिवस**

**१. कोरेगाव**

सकाळी ९.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयाजवळ सर्वांची सभा आयोजित केली. त्यामध्ये सर्वांनी गाव नियमितपणे स्वच्छ व सुंदर ठेवणे तसेच संपूर्ण गाव व्यसनमुक्त करणेची शपथ घेतली. स्वच्छता अभियान नियमित राबवून ग्रामस्वच्छता स्पर्धेमध्ये यश संपादन करणेचा संकल्प सर्वांनी केला.

**२. शेळकेवाडी**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान सांगता समारंभ दिवस म्हणून साजरा करण्यात आला. सर्व ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीसमोर सभास्थानी उभे राहून राष्ट्राशी एकनिष्ठ राहण्याचे व अभियानकाळात केलेली स्वच्छता पुढील काळात अशीच चालू ठेवण्याची शपथ घेतली.

स्वच्छता अभियानकाळात सर्वांनी एकजूटीने स्वच्छता मोहीम यशस्वी केली. ही एकजूट लाखमोलाची आहे असे विचार संरपंचानी व्यक्त केले.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी कशी करावी, कोणकोणते कार्यक्रम राबवावेत यासंबंधीच्या ज्या मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शेळकेवाडी आणि कोरेगाव या दोन्ही गावांमध्ये सदर अभियानातील विविध कार्यक्रमांची अमंलबजावणी केल्याचे दिसून येते.

**संदर्भ**

१. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत कोरेगाव, ता. वाळवा, जि. सांगली

२. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान तथा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छता स्पर्धा, माहितीपुस्तिका (२००५-०६), ग्रामपंचायत शेळकेवाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर